**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**

आयोजित

# प्रेरणा

## नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम

## मूल्यमापन अहवाल



२०२०

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा जीवनस्तर उंचविण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या लाभांचे आदिवासींची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती, प्रगती, आरोग्य इत्यादींवर झालेला परिणाम/बदल याबाबतचे मूल्यमापन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत करण्यात येते.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत आदिवासी मुला/मुलींच्या वसतिगृहांमध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम (प्रेरणा क्लब) हा प्रकल्प सन २०१९-२० साठी मुला/मुलींच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचा विद्यार्थ्यांच्या जीवनमानावर झालेल्या बदलांचा परिणाम व पुढील काळामध्ये या प्रकल्पाची उपयुक्तता तपासण्यासाठी या संस्थेतील ए.क्षे.वि.का. कक्षामार्फत या प्रकल्पाचे मूल्यमापन पूर्ण करण्यात आले आहे. सदर प्रकल्प अपर आयुक्त कार्यालय, ठाणे यांचे अंतर्गत असलेल्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव व राजूर यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण ०८ वसतिगृहांमध्ये राबविण्यात आला. मूल्यमापनासाठी सर्व वसतिगृहांची निवड करून Google Forms व दूरध्वनीव्दारे प्रश्नावलीच्या सहाय्याने  वसतिगृह गृहपाल व निवडलेले विद्यार्थ्यांकडून प्राथमिक माहिती मिळविण्यात आली आहे.

मूल्यमापन अहवालासंबंधीची प्रश्नावली तयार करणे, प्राथमिक माहिती मिळविणे व आलेल्या माहितीचे तक्तीकरण आणि पृथ:करण करण्याची कामे श्री. हंसध्वज सोनवणे, उपसंचालक (ए.क्षे.वि.का.), श्री. चंद्रशेखर पावसे, संशोधन अधिकारी व श्रीमती लीना पाटील, सांख्यिकी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली श्री गणेश चिंचकर, संशोधन सहायक, श्री. भूषण गंगधर, संशोधन सहायक व श्री. ब्रम्हानंद देशमुख, प्रकल्प समन्वयक यांनी पूर्ण केलेले आहे. मूल्यमापन अहवाल लेखनाचे काम श्री. ब्रम्हानंद देशमुख, प्रकल्प समन्वयक यांनी पूर्ण केले आहे.

सदर मूल्यमापन पाहणी अहवालाचा प्रशिक्षण विभाग, आ.सं.प्र.सं. पुणे व आदिवासी विकास विभागाचे सर्व वसतिगृह यांच्यासाठी पुढील काळात नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम (प्रेरणा क्लब) राबविण्यासंबंधी मदत होईल अशी अपेक्षा आहे.

दिनांक : 04/09/2020

ठिकाण : पुणे

**(पवनीत कौर,** भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | विषय | पान क्र. |
| --- | --- | --- | --- |
| १. | | प्रस्तावना | १ |
| २. | | अनुक्रणिका | २ |
| ३. | | तक्त्यांची यादी | ३ - ४ |
| ४. | | आकृत्यांची यादी | ४ |
| ५. | प्रकरण पहिले | **प्रकल्पाची माहिती** | ५ - ७ |
| | | प्रस्तावना | ५ |
| | | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे | ५ - ६ |
| | | प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी | ६ |
| | | प्रशिक्षणाचा संक्षिप्त आढावा | ७ |
| ६. | प्रकरण दुसरे | **मूल्यमापनाची कार्यपद्धती** | **८ - १०** |
| | | मूल्यमापनाचे उद्दिष्ट्ये | ८ |
| | | कार्यपध्दती | ८ - १० |
| ७. | प्रकरण तिसरे | **माहितीचे विश्लेषण** | **११ - ४५** |
| | | वसतिगृह गृहपाल यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण | ११ - २२ |
| | | विद्यार्थ्यांमार्फत घेण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण | २३ - ४५ |
| ८. | प्रकरण चौथे | **निष्कर्ष व शिफारसी** | **४६ - ४९** |
| | | निष्कर्ष | ४६ - ४८ |
| | | शिफारसी | ४८ - ४९ |
| ९. | छायाचित्रे | **प्रशिक्षणाची छायाचित्रे** | **५० - ५२** |
| १०. | प्रश्नावली | **प्रश्नावली** | **५३ - ६०** |
| | | वसतिगृह गृहपाल यांच्यासाठीची प्रश्नावली | ५३ - ५५ |
| | | विद्यार्थ्यांसाठीची प्रश्नावली | ५६ - ६० |

## तक्त्यांची यादी


| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | वसतिगृह निहाय निवडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | ९ |
| २. | एकूण वसतिगृह व त्यामधील विद्यार्थी क्षमता आणि सद्यस्थितीत पटावरील विद्यार्थी संख्या | ११ |
| ३. | वसतिगृह निहाय नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाची पूर्ण केलेले टप्पे | १२ |
| ४. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागाविषयीचे गृहपालांची मते | १३ |
| ५. | सर्व विद्यार्थी नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी न होण्याची गृहपालांनी सांगितलेली कारणे | १४ |
| ६. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी विद्यार्थी (प्रेरणा क्लब) | १५ |
| ७. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्य गुणांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलाविषयी गृहपालांची मते | १९ |
| ८. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्य गुणामध्ये झालेले सकारात्मक बाबी विषयीची माहिती | १९ |
| ९. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे गृहपाल व विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या संबंधात सकारात्मक बदल विषयी गृहपालांची मते | २० |
| १०. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगले बदल होण्यासंबंधीचे गृहपालांची मते | २१ |
| ११. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम वसतिगृहात पुढील काळात राबविण्यासंबंधी गृहपालांची मते | २१ |
| १२. | निवडलेल्या विद्यार्थ्यांची जमात निहाय संख्या | २३ |
| १३. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेली पध्दती | २४ |
| १४. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामार्फत घेण्यात आलेल्या प्रक्षेत्र भेटी | २५ |
| १५. | प्रक्षेत्र भेटीचा करिअर च्या दृष्टीकोनातून फायद्याविषयी विद्यार्थ्यांची मते | २५ |
| १६. | प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्याबाबत विद्यार्थ्यांची मते | २६ |
| १७. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आयुष्यात शालेय शिक्षण घेतांना झालेला फायदा | २६ |
| १८. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे गृहपाल व वसतिगृहातील कर्मचारी यांच्याशी सहसंबंध सुधारण्याविषयी विद्यार्थ्यांची मते | २७ |
| १९. | गृहपाल, प्रकल्प प्रशिक्षक व सहाय्यक यांनी घेतलेल्या गुंफण बैठकीच्या उपयुक्तेबाबत विद्यार्थ्यांची मते | २८ |
| २०. | गुंफण बैठकी विषयीचे विद्यार्थ्यांची मते | २९ |
| २१. | लिंगभाव समानता विषयी विद्यार्थ्यांची मते | २९ |
| २२. | नेतृत्व संकल्पनेविषयीचे विद्यार्थ्यांची मते | ३० |
| २३. | अनियमित मासिक पाळी येण्याची विद्यार्थीनींनी सांगितलेली कारणे | ३१ |

| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| २४. | मासिक पाळीतील रक्तस्राव अधिक होण्यासंबधीचे विद्यार्थीनींचे मते | ३२ |
| २५. | वजन वाढण्याची विद्यार्थ्यांनी सांगितलेली कारणे | ३२ |
| २६. | मानसिक आजार वाढण्याची विद्यार्थ्यांनी सांगितलेली कारणे | ३३ |
| २७. | व्यसनाधीनता संकल्पनेविषयी विद्यार्थ्यांनी सांगितलेली मते | ३४ |
| २८. | गृहपाल आणि विद्यार्थी यांचे सहसंबंधाविषयी विद्यार्थ्यांनी सांगितलेली मते | ३५ |
| २९. | नेतृत्व कौशल्य विकासाच्या दृष्टीने नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामार्फत व्यक्तिगत विकासासाठी जास्तीत जास्त माहिती प्राप्त झाल्याविषयी विद्यार्थ्यांची मते | ३६ |
| ३०. | नेतृत्व संवर्धन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम फायदेशीर असण्याबाबतचे विद्यार्थ्यांनी सांगितलेली मते | ३६ |
| ३१. | प्रकल्प प्रशिक्षक व प्रकल्प सहाय्यक यांचेकडून या प्रकल्पाशिवाय मिळालेल्या माहिती/मदत विषयी विद्यार्थ्यांनी सांगितलेली मते | ३७ |
| ३२. | नेतृत्व संवर्धन कौशल्य उपक्रमातून प्रत्यक्ष प्रेरित होऊन वेगळे उपक्रम आपल्या वसतिगृहात या माध्यमातून राबविण्यात जाण्याविषयी विद्यार्थ्यांनी सांगितलेली मते | ३८ |
| ३३. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाची विद्यार्थ्यांनी सांगितलेली उद्दिष्ट्ये | ३९ |
| ३४. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामार्फत घेण्यात आलेल्या सत्रांचे विषय | ४० - ४१ |
| ३५. | स्वप्नातील वसतिगृह कसे असावे या संदर्भातील विद्यार्थ्यांची मते | ४३ - ४४ |
| ३६. | नेतृत्व संवर्धन कौशल्य उपक्रमातून प्रत्येक्ष प्रेरित होऊन वसतिगृहामध्ये राबविण्यात येणारे उपक्रम | ४५ |


## आकृत्यांची यादी


| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | सर्व विद्यार्थी नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी न होण्याची गृहपालांनी सांगितलेली कारणे | १४ |
| २. | गृहपालांच्या मते नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वागणुकीत जाणवलेल्या फरकाविषयीचे मते | १८ |
| ३. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेली पध्दती | २४ |
| ४. | मानसिक आजार वाढण्याची कारणे | ३३ |

# प्रकरण पहिले

# प्रकल्पाची माहिती

**प्रस्तावना :**

किशोरवय हे मुख्यतः मानसिक-सामाजिक परिपक्वतेचा काळ आहे. पौगंडावस्था आणि किशोरवय हे दोन्ही कालखंड काही काळ एकमेकांबरोबर समांतर जात असले तरी किशोरवयाचा वैशिष्ट्यपूर्ण कालखंड जास्त पसरट आहे. त्याची व्याप्ती शारीरिक-बौद्धिक-मानसिक-सामाजिक अशी सर्वसमावेशक आहे. त्यातील शारीरिक-बौद्धिक-सामाजिक परिपक्वतेची प्रक्रिया पुढे तारुण्यात व प्रौढावस्थेतही चालू राहते. या सर्व प्रक्रिया थोड्या पुढे मागे सुरु होतात व संपतात. सर्वसामान्यपणे वयाच्या दहाव्या वर्षापासून सोळा ते वीस वर्षापर्यंतच्या कालखंडाला किशोरावस्था मानण्यात येते. मुलाची सामाजिक-आर्थिक-कौटुंबिक परिस्थिती, पोषण, भोवतालचे वातावरण, त्या ठिकाणची प्राकृतिक-सामाजिक-संस्कृतीक वैशिष्टे इ. वर अवलंबून असतो. या काळात मुलामुलींना शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदलांना सामोरे जावे लागते. हे बदल समजून घेण्यासाठी आणि त्यांचे नियमन करण्यासाठीअशा काळातील मुलामुलींना शालेय अभ्यासाव्यतिरिक्त इतर जीवन कौशल्य शिक्षणाचीही आवश्यकता असते.

आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा आणि वसतिगृह यामधील विद्यार्थ्यांना स्वतःचे समायोजन करण्यास समर्थ बनवण्यासाठी त्यांची कौशल्ये वाढवण्याची विशेष गरज आहे. या गरजेच्या अनुषंगाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथील प्रशिक्षण विभागामार्फत सन २०१९-२० या कालावधीसाठी आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी  नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम (प्रेरणा क्लब) सुरु करण्यात आला.

**नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे:**

- युवतींना स्वतःच्या कौशल्यांची जाणीव होणे.
- स्वतःच्या सुरक्षिततेविषयी माहिती आणि विचार जागृत होणे.
- नियोजन कौशल्ये आणि विवेकी निर्णयप्रक्रिया समजणे.
- वसतिगृहातील सकारात्मक व्यवस्थापनाचे नियोजन करणे.
- गृहपालांना विद्यार्थांसोबत व्यवस्थापनाच्या नियोजनात सहभागी करून घेणे.

- रोजच्या जीवनात उपयोगी पडणाऱ्या संस्थांचा परिचय करून घेणे.
- साक्षरता- माध्यम, आर्थिक नियोजन, व्यावहारिक आणि व्यावसायिक कौशल्ये इ. ची माहिती करून घेणे.
- 'पारस' (Passion Aimed Road map And Secrets) शोधणे.

**प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी:**

नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम (प्रेरणा क्लब) हा एकूण पाच महिन्यांसाठी आखण्यात आला असून त्याचे एकूण ४ टप्पे करणात आले.

| अ.क्र. | टप्पे | कार्यपध्दती |
|---|---|---|
| १. | पहिला टप्पा | पहिल्या टप्प्यामध्ये पहिल्या महिन्यात सर्व सहभागी विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे. |
| २. | दुसरा टप्पा | दुसऱ्या टप्प्यात दुसऱ्या महिन्यात प्रत्येक आठवड्यात विद्यार्थ्यांना विविध उपक्रम करण्यास सांगणे व त्याचा आढावा घेणे. |
| ३. | तिसरा टप्पा | तिसरा टप्पा हा तिसरा व चौथ्या महिन्याचा असेल. यामध्ये महिन्यातील पहिल्या व तिसऱ्या रविवारी क्षेत्रभेट देणे व आठवड्यातील उपक्रमांचा आढावा घेणे. |
| ४. | चौथा टप्पा | चौथा टप्पा पाचव्या महिन्यात असेल. यामध्ये पहिल्या आठवड्यात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करणे. |

वरील एकूण टप्प्यापैकी सर्व वसतिगृहांमध्ये पहिला टप्पा पूर्ण झाला आहे व काही ठिकाणी दुसरा टप्पा चालू आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी एकूण ०८ वसतिगृहांसाठी आ.सं.प्र.सं., पुणे मार्फत प्रशिक्षकांची मुलाखतीव्दारे निवड करण्यात आली. निवड झालेल्या प्रशिक्षकांना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे वसतिगृहात घ्यावयाच्या उपक्रमांबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

**प्रशिक्षणाची कार्यपध्दती :**

| नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम | | | | |
|---|---|---|---|---|
| **टप्पा** | **महिना १ (पहिला टप्पा)** | **महिना २ (दुसरा टप्पा)** | **महिना ३, ४ (तिसरा टप्पा)** | **महिना ५ (चौथा टप्पा)** |
| **कालावधी** | सलग पाच दिवस<br>(एकूण २५ तास)<br>(१६ सत्रे) | प्रत्येक रविवारी एकदीड तास असे एकूण चार रविवार—<br>(एकूण ४६ तास/ ४ सत्रे) | दर महिन्याच्या पहिल्या रविवारी ४३तास आणि तिसऱ्या रविवारी ४३तास असे एकूण दोन महिने —<br>(एकूण १६१२ तास - ८ सत्रे) | एक दिवसीय आढावा कार्यशाळा<br>(एकूण ६ तास - ४ सत्रे) |
| **प्रशिक्षणार्थी सूचना** | सर्व विद्यार्थिनी<br>• एकाच वेळी सर्व विद्यार्थिनींचा गट किंवा वेगवेगळ्या वर्गात किंवा शक्य असल्यास दिवसाला दोन गट किंवा दर आठवड्याला एक गट याप्रमाणे सत्र प्रशिक्षण घेतील. | सर्व प्रेरिका<br>• दर आठवडयाला एका तासात कोणता आढावा घ्यायचा आणि पुढील मार्गदर्शन करण्यासाठी परिपूर्ण नियोजन आराखडा करणे गरजेचे आहे. | सर्व प्रेरिका<br>• दर महिन्याला एका तासात कोणता आढावा घ्यायचा आणि पुढील मार्गदर्शन करण्यासाठी परिपूर्ण नियोजन आराखडा करणे गरजेचे आहे. | सर्व विद्यार्थिनी<br>• एका वेळी सर्व विद्यार्थिनी बसू शकतील अशा जागेचे नियोजन करावे लागेल. गटकाम करण्यासाठी जास्त प्रशिक्षकांची गरज पडेल. |
| **प्रशिक्षणार्थीची संख्या** | प्रती गट ४० विद्यार्थिनी | प्रती गट - अंदाजे १६ ते २० असे ०२ गट | प्रती गट - अंदाजे १६ ते २० असे ०२ गट | वसतिगृहनिहाय संख्या |
| **साध्य** | • स्व जाणीव, आरोग्य, नातेसंबंध, विवेकी निर्णय प्रक्रिया,<br>• रचनात्मक शिस्त या मुद्द्यांवर माहिती,<br>• अनुभूती आणि कृतीनिश्चय ठरतील.<br>• निरीक्षण आणि नोंदींचे नियोजन होईल. | • आढावा<br>• नियोजन<br>• विषय- मागील महिन्यात मागे राहिलेला मुद्दा<br>• बँक, पोस्ट ऑफिस,रेल्वे स्टेशन, आरोग्य केंद्र अशा ठिकाणी भेटी,<br>• निरीक्षणे<br>• नोंदी | • आढावा<br>• नियोजन<br>• विषय- माध्यमं (जाहिरात, मोबाईल, चित्रपट, इन्टरनेट)<br>• माहिती, ताकद आणि मर्यादा यावर माहिती घेणे<br>• रचनात्मक प्रयोग<br>• गटवार व्यवसाय करण्याचे नियोजन<br>• आठवडाभर प्रत्येक गटाचा व्यवसाय चालवणे. | पारस(Passion Aimed Roadmap And Secrets) शोध प्रक्रिया कार्यशाळा |

# प्रकरण दुसरे
# मूल्यमापनाची कार्यपध्दती

**मूल्यमापनाचे उद्दिष्ट्ये व कार्यपध्दती :**

- **उद्दिष्ट्ये :**

  १) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांचा अभ्यास करणे.

  २) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम वसतिगृहा मधील विद्यार्थ्यांसाठी परिणामकारक आहे की नाही याचा शोध घेणे.

  ३) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम वसतिगृहांमध्ये राबवावा की नाही यासंबंधीची गरज शोधणे.

  ४) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये असलेल्या त्रुटींचा शोध घेऊन त्यासंबंधी उपाययोजना सुचविणे.

- **कार्यपध्दती :**

  **अ) नमुना निवड :**

नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम हा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या प्रशिक्षण विभागांतर्गत अपर आयुक्त कार्यालय, ठाणे यांचे अंतर्गत असलेल्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव व राजूर यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण ८ वसतिगृहामध्ये सुरु करण्यात आला. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या मूल्यमापनासाठी सर्व वसतिगृहाची निवड करण्यात आली आहे. निवडलेल्या सर्व वसतिगृह गृहपाल यांची मुलाखत घेऊन प्रश्नावली मार्फत प्राथमिक माहिती मिळविण्यात आली आहे.

नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली त्यावेळी गृहपाल यांच्या मार्फत घेतलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे सहभागी विद्यार्थी संख्या ५११ इतकी होती व शेवट पर्यंत ही संख्या ४७० इतकी राहिली. त्यामुळे मूल्यमापनासाठी नमुना निवड ही प्रशिक्षणासाठी शेवट पर्यंत उपस्थित राहिलेल्या एकूण संख्येच्या प्रति वसतिगृह २० % विद्यार्थ्यांची (अपवाद – आकाशवाणी हडपसर, पुणे येथील वसतिगृहामध्ये शेवट पर्यंतचा सहभाग कमी असल्याने तेथिल ५०% नमुना निवड केली आहे) साध्या यादृच्छिक पध्दतीने

निवड करण्यात आली आहे. निवड केलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली मार्फत प्राथमिक माहिती संकलित केली.

**आ) वसतिगृह निहाय निवडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या पुढील प्रमाणे :**

**तक्ता क्र. ०१**

| **अ. क्र.** | **वसतिगृह** | **प्रशिक्षणास सहभागी झालेले विद्यार्थी** | **नमुना निवड** | **नमुना निवडीची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| १. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, अहमदनगर | २२ | ५ | २० % |
| २. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, अहमदनगर | ७१ | १५ | २० % |
| ३. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे | ९५ | १९ | २० % |
| ४. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, सोमवार पेठ, पुणे | ५२ | ११ | २० % |
| ५. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह अमनोरा पार्क,हडपसर, पुणे | ६० | १२ | २० % |
| ६. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह घोडेगाव, ता.आंबेगाव जि पुणे | ६२ | १३ | २० % |
| ७. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह आकाशवाणी, हडपसर, पुणे | १२ | ६ | ५० %* |
| ८. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह भोसरी, चिंचवड, पुणे | ९६ | २० | २० % |
| **एकूण** | | **४७०** | **१०१** | |

* टीप – अपवादात्मक बाब आकाशवाणी हडपसर, पुणे येथील वसतिगृहामधील विद्यार्थिनींचा सदर प्रशिक्षणासाठी शेवट पर्यंतचा सहभाग कमी असल्याने तेथिल ५०% नमुना निवड करण्यात आली आहे.

**इ) सर्वेक्षणाची कार्यपद्धती :**

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या मुल्यामापनासाठी निवडलेल्या वसतिगृह गृहपाल व प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी यांच्याकडून प्रश्नावली मार्फत प्राथमिक माहिती घेण्यात आली आहे. कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे माहिती ही Google Forms व्दारे घेण्यात आली आहे. Google Forms ची लिंक ज्या विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन आहेत त्यांना त्यांच्या वैयक्तिक नंबर वर पाठविण्यात आली व ज्या विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन नाहीत त्यांच्याशी दूरध्वनीव्दारे माहिती संकलित करण्यात आली.

**ई) मूल्यमापनाचे टप्पे :**

खालील तक्त्यामध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम या प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी करण्यात आलेल्या कार्याचे टप्पा व कालावधी निहाय वर्गीकरण दिले आहे.

| **अ.क्र.** | **टप्पा** | **कालावधी** | **केलेली कामे** |
|---|---|---|---|
| १. | पहिला टप्पा | एकूण १५ दिवस | १) सदर प्रशिक्षण कार्यक्रमा संबंधीची माहिती प्रशिक्षण विभाग यांचेकडून मिळविली. याबाबतच्या सर्व संकल्पना समजून घेतल्या.<br>२) मूल्यमापनासाठी प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी विद्यार्थी व गृहपाल यांचेसाठी प्रश्नावली तयार करण्यात आली.<br>३) प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी तयार केलेल्या सर्व प्रश्नावलींचे Google Forms तयार करण्यात आले. |
| २. | दुसरा टप्पा | एकूण २० दिवस | १) प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबवित असलेल्या वसतिगृह गृहपाल यांच्याकडून Google Form मार्फत माहिती संकलित केली.<br>२) प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सदर प्रशिक्षण प्रकल्प राबवित असलेल्या वसतिगृहामधील मूल्यमापनासाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडून Google Form व दूरध्वनीव्दारे प्राथमिक माहितीचे संकलन केले. |
| ३. | तिसरा टप्पा | एकूण १० दिवस | Google Forms व दूरध्वनीव्दारे घेण्यात आलेल्या माहितीचे तक्तीकरण, पृथ:कारण व विश्लेषण केले. |
| ४. | चौथा टप्पा | एकूण १५ दिवस | संकलित माहितीच्या आधारे अहवाल लेखनाचे काम पूर्ण करण्यात आले. |

# प्रकरण तिसरे

# माहितीचे विश्लेषण

## अ) वसतिगृह गृहपाल यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण :

नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या मूल्यमापनासाठी एकूण ०८ वसतिगृह गृहपाल यांच्या कडून प्रश्नावली मार्फत प्राथमिक माहिती घेण्यात आली आहे. वसतिगृह गृहपालांना देण्यात आलेल्या प्रश्नावलीत काही बहुपर्यायी प्रश्नांच्या उत्तरांपैकी केवळ एक पर्याय निवडण्याचे बंधन टाकण्यात आले नाही. त्यानुसार प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे.

### १) एकूण वसतिगृह व त्यामधील विद्यार्थी क्षमता आणि सद्यस्थितीत पटावरील विद्यार्थी संख्या:

**तक्ता क्र. ०२**

| अ.क्र. | वसतिगृह | प्रकल्प कार्यालय | विद्यार्थी क्षमता | पटावरील विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, अहमदनगर | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प राजूर , | २५० | ६० |
| २. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह अहमदनगर | | १२५ | ८० |
| ३. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह मंचर , ता .आंबेगाव, जि.पुणे | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव , | १२५ | १२५ |
| ४. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, सोमवार पेठ, पुणे | | ७५ | ७५ |
| ५. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह अमनोरा पार्क,हडपसर, पुणे | | १०० | ६० |
| ६. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह घोडेगाव, ता.आंबेगाव जि पुणे | | ७५ | ८५ |
| ७. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह आकाशवाणी, हडपसर, पुणे | | १०० | १०० |
| ८. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह भोसरी, चिंचवड, पुणे | | १६० | १६० |
| **एकूण** | | | **१०१०** | **७४५** |

स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते कि, नेतृत्व कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमासाठी एकूण ०८ वसतिगृहाची निवड करण्यात आली होती. निवडलेल्या एकूण वसतिगृहापैकी ०२ वसतिगृहे ही एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर व ०६ वसतिगृहे ही एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांच्या कार्यक्षेत्रातील घेण्यात आली होती.

एकूण वसतिगृहांपैकी ०४ वसतिगृहांमध्ये (मंचर, सोमवार पेठ, आकाशवाणी हडपसर व भोसरी) त्यांच्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचा प्रवेश झालेला दिसतो. तर आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह घोडेगाव, ता. आंबेगाव जि. पुणे या एका वसतिगृहामध्ये त्याच्या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा प्रवेश झालेला दिसतो. एकूण वसतिगृहांपैकी ०३ वसतिगृहांमध्ये (अहमदनगर मुलांचे वसतिगृह, अहमदनगर मुलींचे वसतिगृह व अमनोरा पार्क, हडपसर येथील मुलींचे वसतिगृह) त्यांच्या क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले दिसतात.

**२) वसतिगृह निहाय नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाची पूर्ण केलेले टप्पे :**

**तक्ता क्र. ०३**

| अ.क्र. | वसतिगृह | प्रशिक्षणाचे पूर्ण केलेले टप्पे |
|---|---|---|
| १. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, अहमदनगर | पहिला टप्पा |
| २. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, अहमदनगर | दुसरा टप्पा |
| ३. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे | दुसरा टप्पा |
| ४. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, सोमवार पेठ, पुणे | पहिला टप्पा |
| ५. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह अमनोरा पार्क,हडपसर, पुणे | पहिला टप्पा |
| ६. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे | दुसरा टप्पा (फक्त एक प्रक्षेत्र भेट झाली ) |
| ७. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह आकाशवाणी, हडपसर, पुणे | पहिला टप्पा |
| ८. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह भोसरी, चिंचवड, पुणे | दुसरा टप्पा |

स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाचे एकूण चार टप्पे ठरविण्यात आलेले होते. वरील तक्त्यामध्ये वसतिगृह गृहपाल यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे वसतिगृह निहाय पूर्ण केलेले प्रशिक्षणाचे टप्प्यांची

माहिती दिली आहे. एकूण ०८ वसतिगृहांपैकी ०४ वसतिगृहामध्ये (१.आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह अहमदनगर, २.आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह सोमवार पेठ, ३. आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह अमनोरा पार्क, हडपसर,पुणे, ४. आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह आकाशवाणी, हडपसर, पुणे) प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पूर्ण केलेला आहे.

एकूण ०८ वसतिगृहांपैकी ०४ वसतिगृहामध्ये (१.आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, अहमदनगर, २.आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह मंचर, ता. आंबेगाव जि. पुणे, ३.आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह घोडेगाव, ता.आंबेगाव जि. पुणे, ४.आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह भोसरी चिंचवड, पुणे.) प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा पूर्ण केला आहे. आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह घोडेगाव, ता.आंबेगाव जि. पुणे या वसतिगृहामध्ये दुसऱ्या टप्प्यातील फक्त एक प्रक्षेत्र भेट झालेली आहे.

**३) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागाविषयीचे गृहपालांची मते:**

**तक्ता क्र. ०४**

| **अ.क्र.** | **वसतिगृहातील सर्व विद्यार्थी नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी झाले होते का ?** | **एकूण गृहपाल** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ०२ | २५.०० % |
| २. | नाही | ०६ | ७५.०० % |
| | **एकूण** | **०८** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागाविषयीचे गृहपालांनी सांगितलेली माहिती दर्शविली आहे. तक्त्यामधील माहितीच्या आधारे असे निदर्शनास येते - नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल एकूण ०८ गृहपालांपैकी फक्त ०२ (२५.०० % गृहपालांच्या मते सर्व विद्यार्थी सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहभागी झाले. व ०६ (७५.०० %) गृहपालांच्या मते सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी झाले नाही.

**४) सर्व विद्यार्थी नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी न होण्याची गृहपालांनी सांगितलेली कारणे :**

**तक्ता क्र. ०५**

| अ.क्र. | प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी न होण्याची कारणे | एकूण गृहपाल | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | दैनंदिन महाविद्यालयीन सत्रांमध्ये व्यस्त | ०७ | ८७.५० % |
| २. | सहभागी होण्यास इच्छुक नाही | ०२ | २५.०० % |
| ३. | स्पर्धा परीक्षा संबंधीच्या वर्गांमध्ये व्यस्त | ०२ | २५.०० % |
| **एकूण** | | **०८** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

**आकृती क्र. ०१**




स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्या/आकृतीमध्ये सर्व विद्यार्थी प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी न होण्याच्या कारणासंबंधीची माहिती दर्शविली आहे. तक्त्या/आकृतीमधील माहितीचे अवलोकन केले असता एकूण ८ गृहपालांपैकी ०७ (८७.५०%) गृहपाल असे सांगतात की विद्यार्थी त्यांच्या दैनंदिन महाविद्यालयीन सत्रांमध्ये व्यस्त असतात, ०२ (२५.० %) गृहपालांच्या मते काही विद्यार्थी सहभागी होण्यास इच्छुक नसतात व ०२ (२५.० %) गृहपालांच्या मते विद्यार्थी स्पर्धा परीक्षा संबंधीच्या वर्गांमध्ये व्यस्त असतात. या मुख्य कारणांमुळे सर्व विद्यार्थी नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाला सहभागी न झाल्याचे निदर्शनास आले.

### ५) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी विद्यार्थी (प्रेरणा क्लब):

**तक्ता क्र. ०६**

| अ. क्र. | वसतिगृह | पटावरील विद्यार्थी संख्या | प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रशिक्षणाच्या शेवटपर्यंत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | पटावरील विद्यार्थ्यांपैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी विद्यार्थ्यांची टक्केवारी | पटावरील विद्यार्थ्यांपैकी प्रशिक्षणाच्या शेवटपर्यंत सहभागी विद्यार्थ्यांची टक्केवारी | प्रशिक्षणासाठी सुरुवातीपासून ते शेवट पर्यंत सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, अहमदनगर | ६० | ३० | २२ | ५०.०० % | ३६.६६ % | ७३.३३ % |
| २. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह अहमदनगर | ८० | ८० | ७१ | १००.०० % | ८८.७५ % | ८८.७५ % |
| ३. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह मंचर, ता .आंबेगाव, जि.पुणे | १२५ | १०९ | ९५ | ८७.२० % | ७६.०० % | ८७.१५ % |
| ४. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, सोमवार पेठ, पुणे | ७५ | ३० | ५२ | ४०.०० % | ६९.३३ % | १७३.३३ % |
| ५. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह अमनोरा पार्क,हडपसर, पुणे | ६० | ६० | ६० | १००.०० % | १००.०० % | १००.०० % |
| ६. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह घोडेगाव, ता.आंबेगाव जि. पुणे | ८५ | ६२ | ६२ | ७२.९४ % | ७२.९४ % | १००.०० % |
| ७. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह आकाशवाणी, हडपसर, पुणे | १०० | ३४ | १२ | ३४.०० % | १२.०० % | ३५.२९ % |
| ८. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह भोसरी, चिंचवड, पुणे | १६० | १०६ | ९६ | ६६.२५ % | ६०.०० % | ९०.५६ % |
| **एकूण** | | **७४५** | **५११** | **४७०** | **६८.५९ %** | **६३.०८ %** | **९१.९७ %** |

स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते - एकूण ८ वसतिगृहामध्ये पटावरील विद्यार्थी संख्या ७४५ इतकी आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वसतिगृहामधून पटावरील एकूण ७४५ विद्यार्थ्यांपैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला ५११ (६८.५९%) इतके विद्यार्थी सहभागी झाले होते. पटावरील एकूण ७४५ विद्यार्थ्यांपैकी प्रशिक्षणाच्या शेवटपर्यंत एकूण ४७० (६३.०८%) इतके विद्यार्थी सहभागी झाले. परंतु सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण ५११ विद्यार्थ्यांपैकी शेवटपर्यंत एकूण ४७० (९१.९७%) विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतला.

**वसतिगृह निहाय माहिती विश्लेषणावरून निदर्शनास येते —**

१) अहमदनगर येथील मुलांच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या ६० इतकी आहे. पटावरील एकूण ६० विद्यार्थ्यांपैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला ३० (५०.००%) विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पटावरील एकूण ६० विद्यार्थ्यांपैकी २२ (३६.६६%) विद्यार्थी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाले. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण ३० विद्यार्थ्यांपैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत २२ (७३.३३%) विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला.

२) अहमदनगर येथील मुलींच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या ८० इतकी आहे. पटावरील एकूण ८० विद्यार्थीनी पैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला ८० (१००%) विद्यार्थीनी सहभाग घेतला होता. पटावरील एकूण ८० विद्यार्थीनी पैकी ७१ (८८.७५%) विद्यार्थीनी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाल्या. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण ८० विद्यार्थीनी पैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत ७१ (८८.७५%) विद्यार्थीनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला.

३) मंचर येथील मुलींच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या १२५ इतकी आहे. पटावरील एकूण १२५ विद्यार्थीनी पैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला १०९ (८७.२०%) विद्यार्थीनी सहभाग घेतला होता. पटावरील एकूण १२५ विद्यार्थीनी पैकी ९५ (७६.००%) विद्यार्थीनी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाल्या. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण १०९ विद्यार्थीनी पैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत ९५ (८७.१५%) विद्यार्थीनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला.

४) सोमवार पेठ, पुणे येथील मुलींच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या ७५ इतकी आहे. पटावरील एकूण ७५ विद्यार्थीनी पैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला ३० (४०.००%) विद्यार्थीनी सहभाग घेतला होता. पटावरील एकूण ७५ विद्यार्थीनी पैकी ५२ (६९.३३%) विद्यार्थीनी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाल्या. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण ३० विद्यार्थीनी पैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत ५२ (१७३.३३%) विद्यार्थीनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला. म्हणजेच येथे प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या विद्यार्थीनी पेक्षा प्रशिक्षणाच्या शेवटपर्यंत २२ (७३.३३%) विद्यार्थ्यींची वाढ झाली आहे असे दिसते.

५) अमनोरा पार्क हडपसर, पुणे येथील मुलींच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या ६० इतकी आहे. पटावरील एकूण ६० विद्यार्थीनी पैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला ६० (१००.००%) विद्यार्थीनी

सहभाग घेतला होता. पटावरील एकूण ६० विद्यार्थींनी पैकी ६० (१००.००%) विद्यार्थींनी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाल्या. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण ६० विद्यार्थींनी पैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत ६० (१००.००%) विद्यार्थींनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला. म्हणजेच या वसतिगृहामध्ये सदर प्रशिक्षणाला १००.०० % प्रतिसाद मिळालेला दिसून येतो.

६) घोडेगाव, ता.आंबेगाव जि. पुणे येथील मुलींच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या ८५ इतकी आहे. पटावरील एकूण ८५ विद्यार्थींनी पैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला ६२ (७२.९४%) विद्यार्थींनी सहभाग घेतला होता. पटावरील एकूण ८५ विद्यार्थींनी पैकी ६२ (७२.९४%) विद्यार्थींनी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाल्या. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण ६२ विद्यार्थींनी पैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत ६२ (१००.००%) विद्यार्थींनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला. म्हणजेच येथे प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या विद्यार्थींनीची संख्या प्रशिक्षणाच्या शेवटपर्यंत कायम राहिलेली दिसून येते.

७) आकाशवाणी हडपसर, पुणे येथील मुलींच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या १०० इतकी आहे. पटावरील एकूण १०० विद्यार्थींनी पैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला ३४ (३४.००%) विद्यार्थींनी सहभाग घेतला होता. पटावरील एकूण १०० विद्यार्थींनी पैकी १२ (१२.००%) विद्यार्थींनी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाल्या. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण ३४ विद्यार्थींनी पैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत १२ (३५.२९%) विद्यार्थींनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला. या वसतिगृहामध्ये विद्यार्थींनींचे प्रशिक्षण शेवटपर्यंत पूर्ण करण्याचे प्रमाण सर्वात कमी दिसून येते.

८) भोसरी चिंचवड, पुणे येथील मुलींच्या वसतिगृहामध्ये पटावरील एकूण विद्यार्थी संख्या १६० इतकी आहे. पटावरील एकूण १६० विद्यार्थींनी पैकी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला १०६ (६६.२५%) विद्यार्थींनी सहभाग घेतला होता. पटावरील एकूण १६० विद्यार्थींनी पैकी ९६ (६०.००%) विद्यार्थींनी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत सहभागी झाल्या. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागी झालेल्या एकूण १०६ विद्यार्थींनी पैकी प्रशिक्षणाच्या शेवट पर्यंत ९६ (९०.५६%) विद्यार्थींनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला. या वसतिगृहामध्ये विद्यार्थींनींचे प्रशिक्षण शेवटपर्यंत प्रशिक्षणात सहभाग घेण्याचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे निदर्शनास येते.

**६) गृहपालांच्या मते नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वागणुकीत जाणवलेल्या फरकाविषयी गृहपालांची मते :**

**आकृती क्र. ०२**




स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वागणुकीत पडलेल्या फरकाविषयी आकृती क्र. १ मधील माहितीवरून असे समजते - एकूण ०८ गृहपालांपैकी ०३ (३७.००%) गृहपाल असे सांगतात कि सदर प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वागणुकीत खूप चांगला फरक पडला आहे, ०४ (५०.००%) गृहपालांच्या मते या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांची वागणुकीत  चांगला फरक पडला आहे व ०१ (१३.००%) गृहपालाच्या मते या प्रशिक्षणामुळे मुलांच्या वागणुकीत बरा फरक पडल्याचे निदर्शनास येते.

**७) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्य गुणांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलाविषयी गृहपालांची मते :**

**तक्ता क्र. ०७**

| अ.क्र. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्य गुणांमध्ये सकारात्मक फरक जाणवला का ? | एकूण गृहपाल | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०८ | १००.०० % |
| २. | नाही | ०० | ०.०० % |
| **एकूण** | | **०८** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्य गुणामध्ये झालेल्या सकारात्मक बदलाविषायी गृहपालांनी सांगितली माहिती दिली आहे. माहितीचे अवलोकन केले असता असे दिसते कि, सर्व गृहपालांच्या (१००.००%) मते नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थांच्या नेतृत्व कौशल्य गुणांमध्ये सकारात्मक बदल दिसून आला आहे.

**८) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्य गुणामध्ये झालेले सकारात्मक बाबी विषयीची माहिती :**

**तक्ता क्र. ०८**

| अ.क्र. | सकारात्मक बाबी | एकूण गृहपाल | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | वसतिगृहामध्ये विद्यार्थी स्वत: कार्यक्रमाचे नियोजन करतात | ०६ | ७५.०० % |
| २. | वसतिगृह नियोजनात मदत करतात | ०७ | ८७.५० % |
| ३. | सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून वसतिगृह स्वच्छता करतात | ०४ | ५०.०० % |
| ४. | एखाद्या कार्यक्रमामध्ये भाषणात सहभाग घेतात | ०६ | ७५.०० % |
| ५. | वैयक्तिक स्वच्छता राखतात | ०८ | १००.०० % |
| ६ . | आकाशवाणी केंद्र येथे आदिवासी गीतांच्या कार्यक्रमाचे नियोजन | ०१ | १२.५० % |
| **एकूण** | | **०८** | |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्याच्या माहितीच्या आधारे असे दिसते - नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्याक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कौशल्य या गुणात बदल झाले आहे. विद्यार्थी स्वतःहून वसतिगृहातील उपक्रमांमध्ये सहभाग घेत आहे. याविषयी एकूण ०८ गृहपालांपैकी ०६ (७५.० %) गृहपालांच्या मते वसतिगृहामध्ये

विद्यार्थी स्वतः एखाद्या कार्यक्रमाचे नियोजन करू लागले आहे, ०७ (८७.५%) गृहपालांच्या मते विद्यार्थी वसतिगृह नियोजनात मदत करत आहेत, ०४ (५०.० %) गृहपालांच्या मते विद्यार्थी सर्व सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून वसतिगृह स्वच्छता करू लागले आहे, ०६ (७५.०%) गृहपालांच्या मते विद्यार्थी एखाद्या कार्यक्रमामध्ये स्वतःहून सहभाग घेत आहे, सर्व गृहपालांच्या मते विद्यार्थी वैयक्तिक स्वच्छता राखत आहे व ०१ (१२.५%) गृहपालांनी असे सांगितले कि त्यांच्या वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांनी आकाशवाणी केंद्र येथे स्वतःहून आदिवासी गीतांच्या कार्यक्रमाचे नियोजन केले जातात इ. स्वरूपाचे बदल विद्यार्थ्यामध्ये झाल्याचे वरील माहितीच्या अवलोकनावरून दिसून येते.

**९) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे गृहपाल व विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या संबंधात सकारात्मक बदल विषयी गृहपालांची मते :**

**तक्ता क्र. ०९**

| अ.क्र. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे गृहपाल व विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या संबंधात सकारात्मक बदल झाले का ? | एकूण गृहपाल | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०८ | १००.०० |
| २. | नाही | ०० | ०.०० |
| **एकूण** | | **०८** | **१००.००** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे गृहपाल व विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या संबंधात सकारात्मक बदलाविषयीची माहिती दर्शविली आहे. माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे सर्वच गृहपालांच्या (१००.०%) मते नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे गृहपाल व विद्यार्थी यांच्यातील संबंधात सकारात्मक बदल झालेला आहे.

### १०) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगले बदल होण्यासंबंधीचे गृहपालांची मते :

**तक्ता क्र. १०**

| अ.क्र. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगले बदल होऊ शकतात का ? | एकूण गृहपाल | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०८ | १००.०० % |
| २. | नाही | ०० | ०.०० % |
| **एकूण** | | **०८** | **१००.००%** |

स्त्रोत — प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगले बदल होण्यासंबंधीची माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे सर्वच गृहपालांना (१००.०%) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगले बदल होत असल्याचे दिसून आले.

### ११) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम वसतिगृहात पुढील काळात राबविण्यासंबंधी गृहपालांची मते :

**तक्ता क्र. ११**

| अ.क्र. | नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम वसतिगृहात पुढे राबवावासा वाटतो का ? | एकूण गृहपाल | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०८ | १००.०० % |
| २. | नाही | ०० | ०.०० % |
| **एकूण** | | **०८** | **१००.०० %** |

स्त्रोत — प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम वसतिगृहात पुढील काळामध्ये राबविण्यासंबंधीची माहिती दर्शविली आहे. तक्त्यातील माहितीवरून असे अवलोकन होते - नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी पुढील काळामध्ये वसतिगृहामध्ये राबवावा असे सर्व गृहपालांनी (१००.०%) मत मांडले आहे.

**१२) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत गृहपालांचे सर्वसाधारण अभिप्राय :**

सर्व गृहपालांनी नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम संबंधी त्याचे सर्वसाधारण अभिप्राय खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

- सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये खूप सकारात्मक बदल घडून आला आहे .असे प्रशिक्षण हे वर्षभर वसतिगृहात राबवावे असे वाटते.
- सदर प्रशिक्षणामधून मुलीच्या मधील सुप्त गुणाना व्यक्त होण्याची संधी मिळाली ,सुसंवाद घडून आला.
- सदर प्रशिक्षणात योगासन आणि गुंफण बैठक विशेष महत्वपूर्ण होती. यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला हातभार मिळला. विद्यार्थ्यांना प्रेरणा देतील अशा प्रकारचे प्रशिक्षण एकंदरीत अनमोल होते.
- प्रेरणा प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व विकास व नेतृत्व गुणांमध्ये वाढ होण्यास मदत झाली. तसेच स्वच्छतेची आवड निर्माण झाली. त्यामुळे असे कार्यक्रम दर वर्षी वसतिगृहात असायला हवेत.
- सदर प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्माक बदल घडुन येतात. विद्यार्थ्यांना आत्मानिर्भर होणेस मदत होते. सामान्य तसेच व्यावहारीक ज्ञानात वाढ होते.
- सदर प्रशिक्षण विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडविण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे.तसेच त्यांची वसतीगृहाबद्दलची संकल्पना स्पष्ट करण्याबरोबर कर्तव्य व जबाबदाऱ्या अवगत करण्याचे भक्कम माध्यम आहे.
- विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम आवश्यक आहे.
- मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी या प्रशिक्षण कार्यक्रमाचा खूप लाभ झाला.

**ब) विद्यार्थ्यांमार्फत घेण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण :**

नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम एकूण ०८ वसतिगृहामध्ये कार्यान्वित होता. एकूण ०८ वसतिगृहांपैकी ०७ ही मुलींची व ०१ हे मुलांच वसतिगृहांचा यामध्ये समावेश होता. मूल्यमापनाच्या अभ्यासासाठी एकूण १०१ विद्यार्थ्यांकडून प्राथमिक माहिती मिळविण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रश्नावलीत काही बहुपर्यायी प्रश्नांच्या उत्तरांपैकी केवळ एक पर्याय निवडण्याचे बंधन टाकण्यात आले नाही. त्यानुसार प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. उपलब्ध झालेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे :

**१) निवडलेल्या विद्यार्थ्यांची जमात निहाय संख्या :**

**तक्ता क्र. १२**

| अ. क्र. | जमात | वसतिगृह | | | | | | | | एकूण | जमात निहाय टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अहमदनगर (मुले) | अहमदनगर (मुली) | आकाशवाणी हडपसर | ॲमेनोरा हडपसर | भोसरी | मंचर | सोमवार पेठ,पुणे | घोडेगाव | | |
| १. | भिल्ल | ०० | ०४ | ०१ | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०८ | ७.९२ % |
| २. | गोंड | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०.९९ % |
| ३. | हलबी | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०.९९ % |
| ४. | कातकरी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०२ | १.९८ % |
| ५. | कोकणा | ०१ | ०० | ०१ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०६ | ५.९४ % |
| ६. | महादेव कोळी | ०१ | ०५ | ०२ | ०५ | ०८ | ११ | ०६ | १० | ४८ | ४७.५२ % |
| ७. | परधान | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०२ | १.९८ % |
| ८. | पारधी | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०.९९ % |
| ९. | पावरा | ०१ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०४ | ३.९६ % |
| १०. | ठाकर | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०५ | ४.९५ % |
| ११. | वारली | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | १.९८% |
| १२. | अनुसूचित जमाती | ०० | ०२ | ०१ | ०२ | ०६ | ०६ | ०१ | ०३ | २१ | २०.७९ % |
| **एकूण** | | **०५** | **१५** | **०६** | **१२** | **२०** | **१९** | **११** | **१३** | **१०१** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये मूल्यमापनासाठी प्रथामिक माहिती दिलेल्या विद्यार्थ्यांची वसतिगृह व जमात निहाय वर्गीकरण करण्यात आले आहे. जमात निहाय वर्गीकरणावरून असे दिसते - एकूण १०१ विद्यार्थ्यांपैकी भिल्ल जमातीचे ०८ (७.९२%), गोंड जमातीचे ०१ (०.९९%), हलबी जमातीचे ०१ (०.९९%),

कातकरी जमातीचे ०२ (१.९८%), कोकण जमातीचे ०६ (५.९४%), महादेव कोळी ४८ (४७.५२%), परधान जमातीचे ०२ (१.९८%), पारधी जमातीचे ०१ (०.९९%), पावरा जमातीचे ०४ (३.९६%), ठाकर जमातीचे ०५ (४.९५%), वारली जमातीचे ०२ (१.९८%) व अनुसूचित जमात २१ (२०.७९%) इतके दिसते. एकूण विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थ्यांनी त्यांची मूळ जमात न सांगता फक्त अनुसूचित जमात असा प्रतिसाद दिला आहे. माहितीच्या आधारे महादेव कोळी या जमातीचे विद्यार्थ्यी सर्वात जास्त दिसून येतात. इतर जमातीच्या तुलनेमध्ये महादेव कोळी या जमातीचे विद्यार्थ्यी सर्व वसतिगृहामध्ये आढळून येतात.

**२) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेली पध्दती :**

**तक्ता क्र. १३**

| अ.क्र. | वापरण्यात आलेल्या पध्दती | एकूण विद्यार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अध्ययन पद्धती | ६५ | ६४.३५ % |
| २. | दृक् श्राव्य माध्यम | ५७ | ५६.४३ % |
| ३. | मानसशास्त्रीय खेळ | ६४ | ६३.३६ % |
| ४. | विषय आधारित कृती | ७४ | ७३.२६ % |
| ५. | प्रात्येक्षिक व संवाद | ८० | ७९.२० % |
| ६. | चर्चासत्रे व सहभाग | ८७ | ८६.१३ % |
| **एकूण** | | **१०१** | |

स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

**आकृती क्र. ०३**




स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यावरून नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या प्रशिक्षण पद्धतीचे अवलोकन होते. माहिती वरून असे निदर्शनास येते - एकूण १०१ विद्यार्थ्यांपैकी ६५ (६४.३५%) विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी अध्ययन पध्दतीचा वापर केला असे सांगितले, ५७ (५६.४३%) विद्यार्थ्यांनी दृक् श्राव्य माध्यम पध्दती वापर केला असे सांगितले, ६४ (६३.३६%) विद्यार्थ्यांनी मानसशास्त्रीय खेळ पध्दती वापर केला असे सांगितले, ७४ (७३.२६%) विद्यार्थ्यांनी विषय आधारित कृती पध्दती वापर केला असे सांगितले, ८० (७९.२०%) विद्यार्थ्यांनी प्रात्येक्षिक व संवाद पध्दती वापर केला असे सांगितले व ८७ (८६.१३%) विद्यार्थ्यांनी चर्चासत्रे व सहभाग पध्दतीचा वापर करण्यात आला असे सांगितले.

**३) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामार्फत घेण्यात आलेल्या प्रक्षेत्र भेटी :**

**तक्ता क्र. १४**

| **अ.क्र.** | **प्रक्षेत्र भेटी झाल्या आहे का ?** | **एकूण विद्यार्थी** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ७२ | ७१.२८ % |
| २. | नाही | २८ | २७.७२ % |
| ३. | माहिती नाही | ०१ | ०.९९ % |
| **एकूण** | | **१०१** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यावरून सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या प्रक्षेत्र भेटी विषयीची माहिती मिळते. माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसते - एकूण विद्यार्थ्यांपैकी ७२ (७१.२८%) विद्यार्थ्यांनी प्रक्षेत्र भेटी झाल्या असे सांगितले, २८ (२७.७२%) विद्यार्थ्यांनी प्रक्षेत्र भेटी झाल्या नाही असे सांगितले व ०१ (०.९९%) विद्यार्थ्याने प्रक्षेत्र भेटी विषयी माहिती नाही असे सांगितले.

**४) प्रक्षेत्र भेटीचा करिअर च्या दृष्टीकोनातून फायद्याविषयी विद्यार्थ्यांची मते :** (प्रक्षेत्र भेट झाली आहे असे सांगितलेल्या एकूण ७२ विद्यार्थ्यांपैकी)

**तक्ता क्र. १५**

| **अ.क्र.** | **प्रक्षेत्र भेटीचा करिअर च्या दृष्टीकोनातून आपणास फायदा झाला आहे का ?** | **एकूण विद्यार्थी** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ७१ | ९८.६१ % |
| २. | नाही | ०१ | १.३८ % |
| **एकूण** | | **७२** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रक्षेत्र भेटीचा करिअर च्या दृष्टीकोनातून फायदा झाला की नाही याविषयीची माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते - प्रक्षेत्र भेटी झाल्या आहे असा प्रतिसाद दिलेल्या एकूण ७२ विद्यार्थ्यांपैकी ७१ (९८.६१%) विद्यार्थ्यांनी प्रक्षेत्र भेटीचा फायदा झाला आहेत असे सांगितले व ०१ (१.३८%) विद्यार्थ्याने प्रक्षेत्र भेटीचा करिअर च्या दृष्टीकोनातून फायदा झाला नाही असे सांगितले आहे.

**५) प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्याबाबत विद्यार्थ्यांची मते :** (प्रक्षेत्र भेट झाली आहे असे सांगितलेल्या एकूण ७२ विद्यार्थ्यांपैकी)

**तक्ता क्र. १६**

| **अ.क्र.** | **प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्यात तुम्ही स्वत: प्रत्येक्ष सहभाग घेतला आहे का ?** | **एकूण विद्यार्थी** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ६५ | ९०.२७ |
| २. | नाही | ०७ | ९.७२ |
| **एकूण** | | **७२** | **१००.००** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्या मध्ये सदर प्रशिक्षणांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या प्रक्षेत्र भेटीच्या नियोजनामध्ये विद्यार्थी सहभागी झाले की नाही याविषयीची माहिती दिली आहे. माहिती वरून असे निदर्शनास येते - प्रक्षेत्र भेटी झाल्या आहे असा प्रतिसाद दिलेल्या एकूण ७२ विद्यार्थ्यांपैकी ६५ (९०.२७%) विद्यार्थ्यांनी प्रक्षेत्र भेटीच्या नियोजनामध्ये सहभाग घेतला आहे व ०७ (९.७२%) विद्यार्थ्यांनी प्रक्षेत्र भेटीच्या नियोजनामध्ये सहभाग घेतला नाही असे सांगितले आहे.

**६) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आयुष्यात शालेय शिक्षण घेतांना झालेला फायदा :**

**तक्ता क्र. १७**

| **अ.क्र.** | **वैयक्तिक आयुष्यात शालेय शिक्षण घेतांना या उपक्रमाचा फायदा झाला आहे का ?** | **एकूण विद्यार्थी** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ९१ | ९०.०९ % |
| २. | नाही | ०७ | ६.९३ % |
| ३. | कोणताही प्रतिसाद नाही | ०३ | २.९७ % |
| **एकूण** | | **१०१** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम या उपक्रमाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात शिक्षण घेतांना फायदा झाला आहे कि नाही या विषयीची माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते - एकूण विद्यार्थ्यांपैकी ९१ (९०.०९) विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणाचा त्यांना वैयक्तिक आयुष्यात शिक्षण घेतांना फायदा झाला आहे असे सांगितले, ०७ (६.९३%) विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणाचा त्यांना वैयक्तिक आयुष्यात शिक्षण घेतांना फायदा झाला नाही असे सांगितले व ०३ (२.९७%) विद्यार्थ्यांना यासंबंधी कोणताही प्रतिसाद दिला नाही .

**७) नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे गृहपाल व वसतिगृहातील कर्मचारी यांच्याशी सहसंबंध सुधारण्याविषयी विद्यार्थ्यांची मते :**

**तक्ता क्र. १८**

| अ. क्र. | गृहपाल व वसतिगृहातील कर्मचारी यांच्याशी सहसंबंध सुधारण्यास या प्रशिक्षण कार्यक्रमाची मदत झाली आहे का ? | एकूण विद्यार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ८३ | ८२.१७ % |
| २. | नाही | ०१ | ०.९९ % |
| ३. | सांगता येत नाही | १५ | १४.८५ % |
| ४. | कोणताही प्रतिसाद नाही | ०२ | १.९८ % |
| | **एकूण** | **१०१** | **१००.०० %** |

स्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्त्यामध्ये नेतृत्व संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमामुळे गृहपाल व वसतिगृह कर्मचारी यांच्याशी विद्यार्थ्यांचे सहसंबंध सुधारण्यास मदत झाली कि नाही याविषयीची माहिती दिली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते - एकूण विद्यार्थ्यांपैकी ८३ (८२.१७%) विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणामुळे गृहपाल व वसतिगृह कर्मचारी यांच्याशी सहसंबंध सुधारण्यास मदत झाली आहे असे सांगितले, ०१ (०.९९%) विद्यार्थ्याने सहसंबंध सुधारण्यास मदत झाली नाही असे सांगितले, १५ (१४.८५%) विद्यार्थ्यांनी सहसंबंध सुधारण्याविषयी सांगता येत नाही असे सांगितले व ०२ (१.९८%) विद्यार्थ्यांनी यासंबंधी कोणताच प्रतिसाद दिलेला दिसत नाही.

**८) गृहपाल, प्रकल्प प्रशिक्षक व सहाय्यक यांनी घेतलेल्या गुंफण बैठकीच्या उपयुक्ततेबाबत विद्यार्थ्यांची मते :**

**तक्ता क्र. १९**

| **अ. क्र.** | **विद्यार्थ्यांच्या समस्या कमी होण्यासाठी गृहपाल, प्रकल्प प्रशिक्षक व सहाय्यक यांनी घेतलेली गुंफण बैठक उपयुक्त झाली आहे का ?** | **एकूण विद्यार्थी** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | ८७ | ८६.१३ % |
| २. | नाही | ०० | ०.०० % |
| ३. | गुंफण बैठक झाली नाही | ११ | १०.८९ % |
| ४. | कोणताही प्रतिसाद नाही | ०३ | २.९७ % |
| | **एकूण** | **१०१** | **१००.०० %** |

स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

